**प्रेसनोट** दिनांक ११/०२/२०२०

**शिर्षक :- लोकसेविका श्रीमती आकांक्षा कमलेश्वर रणवरे, वय ४१ वर्षे,विशेष सहायक सरकारी अभियोक्ता, प्रथम वर्ग न्यायालय क्रमांक २ फलटण रा.प्लॉट नं. १० वरद प्लाझा नारळी बाग, गजानन चौक फलटण ता.फलटण,जि.सातारा वर्ग-२, यांना १००००/- रूपये लाच स्विकारले प्रकरणी रंगेहात पकडले. सातारा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | पुणे परिक्षेत्र,सातारा युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | फलटण शहर पो.स्टे. गु.र.नं.४७/२०२० |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) श्रीमती आकांक्षा कमलेश्वर रणवरे,वय ४१ वर्षे,विशेष सहायक सरकारी अभियोक्ता, प्रथम वर्ग न्यायालय क्रमांक २ फलटण रा.प्लॉट नं. १० वरद प्लाझा नारळी बाग, गजानन चौक फलटण ता.फलटण,जि.सातारा,वर्ग २, **इतर लोकसेवक**<br>२) श्रीमती सविता विशाल आगम,वय ३३ वर्षे, महिला पोलीस नाईक ब.नं. २१७५ नेमणुक - फलटण ग्रामीण पोलीस स्टेशन, मुळ रा. पाटखळमाथा ता. जि. सातारा सध्या रा.कावेरी लाईन, पोलीस वसाहत रुमनं. ६ फलटण, वर्ग ३, पोलीस खाते |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १००००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १००००/- |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार/ फिर्यादी यांनी दि.०३/०२/२०२० रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.०३/०२/२०२० रोजी पंचासमक्ष करण्यात आलेली लाचेची पडताळणी व त्यातील संभाषण तसेच दिनांक १०/०२/२०२० रोजी केलेली सापळा कारवाई यादरम्यान घडलेल्या घटना, तसेच प्रत्यक्ष व ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण यावरुन श्रीमती आकांक्षा कमलेश्वर रणवरे,यांनी प्रथम वर्ग न्यायालय क्रमांक २ फलटण या ठिकाणी सहायक सरकारी अभियोक्ता या वर्ग २ चे लोकसेवक पदावर काम करत असताना तक्रारदार यांच्याकडे त्यांनी सासरच्या नातेवाईकांविरुध्द दाखल केलेल्या ४९८ (अ) च्या केसमध्ये मदत करण्यासाठी व घटस्फोट तसेच पोटगीचे प्रकरण लवकर काढण्यासाठी २००००/- रुपयांची लाच मागणीकरुन पहिला टप्पा म्हणुन १००००/- लाच मागणी करुन ती स्विकारण्याची तयारी दर्शविली. तसेच आरोपी लोकसेवक २) सौ. सविता विशाल आगम, महिला पोलीस नाईक ब.नं.२१७५ ने.फलटण ग्रामीण पोलीस स्टेशन,(प्रॉसीक्युशन मदतनीस) यांनी पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार व सहायक सरकारी अभियोक्ता यांचेमध्ये लाच मागणीसंदर्भात चर्चा सुरु असताना चर्चेत सहभागी होवुन संभाषण करुन रणवरे मॅडम हया लाच मागणी करीत आहेत हे माहित असताना देखील त्या ठिकाणी हजर राहून लाच रक्कम देण्यास प्रोत्साहन देवून अपराधास अपप्रेरणा दिली. तसेच दि.१०/०२/२०२० रोजी आयोजीत सापळा कारवाईमध्ये सरकारी वकील श्रीमती रणवरे मॅडम यांनी ते काम करीत असलेल्या कार्यालयामध्ये १४.३७ वा.चे सुमारास तक्रारदार यांचेकडून १०,०००/- रुपये लाच रक्कम मागणी करुन स्विकारुन वैध परिश्रमिकाहुन अन्य पारितोषण म्हणुन आर्थिक फायदा मिळविला म्हणुन त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७, १२ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. |
| विशेष बाब | |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्ट्राचारासंबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.शी संपर्क करावा.

संपर्क पत्ताः- पोलीस उपअधीक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो, सिटी सर्व्हे नं.५२४,सदरबझार सातारा

संकेत स्थळः- acbmaharashtra.gov.in

ई-मेलः- acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार अॅपः- acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांकः- १०६४

दुरध्वनी क्रमांकः- ०२१६२-२३८१३९

व्हॉटसअॅप क्रमांक :-७८७५३३३३३३

मा. सादर

(अशोक शिर्के)

पोलीस उपअधीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा.